स्थायी समितीच्या शुक्रवार दिनांक 11—05—2012 रोजी दुपारी 12—30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 10. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 11. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 12. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 13. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 14. | सौ. जैस्वाल हर्षला संजय | सदस्या |
| 15. | सौ. अल्का अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 16. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 18 :— नागपूर महानगरपालिकेच्या सिमेअंतर्गत व सिमेपलीकडे नव्याने स्थापीत होणाऱ्या उंच इमारतीचे बांधकामाकरीता नगर रचना विभाग, म.न.पा. आणि नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांच्याकडे इमारतमालक/बिल्डर/डेव्हलपर्स यांच्याकडून गगनचुंबी (उंच) इमारतीचे नकाशाची मंजूरी मिळण्याकरीता अर्ज वेळोवेळी प्राप्त होत असल्याने अशा उंच इमारतीत आगीच्या घटना घडल्यास अशावेळी अग्निशामक विभागात आग विझविणारी यंत्रणा तांत्रिक दृष्टया सक्षम करण्याकरीता, अग्निशमन विभागाचे बळकटीकरण करण्याकरीता व संभाव्य आगीपासून बचाव करण्याच्या उद्देशाने नविन आधुनिक अग्निशमन यंत्रणा खरेदी करण्याच्या दृष्टीने नियमित आकारण्यात येणारे शुल्का व्यतीरीक्त खालील प्रमाणे उंच इमारत निधी आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आकारण्यात येणारे शुल्क खालील प्रमाणे

| Sr. No. | Types of Building | Building height (mtrs) | Rates for High rise building Fund | |
|---|---|---|---|---|
| | | | Rate per Sq. mtr. | Maximun High rise building Fund |
| 1 | Residential, Educational, Institutional, Assembly , Business, Mercantile Building | 25 mtrs to 30 mtrs, | 1076 per Sq. mtr. | 25,00,000/- |
| | | 30 mtrs to 45 mtrs, | 1614 per Sq. mtr. | 75,00,000/- |
| | | 45 mtrs to 60 mtrs. | 3228 per Sq. mtr. | 1,50,00,000/- |
| | | 60 mtrs to 75 mtrs. | 4842 per Sq. mtr. | 2,00,00,000/- |

उपरोक्त शुल्काची आकारणी दि. 27.02.2012 पासून मा. आयुक्त, म.न.पा. यांच्या मंजूरी आदे"ान्वये दि. 01.03.2012 पासून शुल्क आकारण्यात येत असून वित्तीय वर्ष सन 2012—13 आय बजट प्रावधान क्रं 25, ''उंच इमारत निधी'' शिर्षक आय बजट प्रावधान अंतर्गत उघडण्यात आलेले आहे आणि रू. 2,27,00,000/— आय प्राप्त झालेली असून मा. अध्यक्ष स्थायी समिती यांना विनंती की सदर विषयाची स्थायी समिती समोर नोंद घेण्यात येवुन नंतर हा विषय कृपया नोंदणी व माहीती करीता म.न.पा. महासभेसमोर सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय स्थायी समिती समोर नोंद घेण्यास्तव प्रशासनाने सादर केला. कोणतेही आर्थिक प्रशासकीय शुल्क आकारण्यापूर्वी स्थायी समितीची मान्यता घेऊन असा प्रस्ताव म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्यात येतो. असे स्थायी समितीचे मत आहे. करीता प्रशासनाने संपूर्ण व योग्य माहितीसह सुधारीत

प्रस्ताव मंजूरी करीता स्थायी समितीच्या पुढील सभेत ठेवण्यासाठी विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 19 :– नागपूर शहरात विविध चौकात बी. ओ. टी. तत्वावर Temperrature, Humidity & Carban Monitaring display Instrumentation सह जाहिरात फलक लावण्याकरीता प्राप्त झालेली मे. दि कन्सेप्ट यांची रु. ३३,३०,७७७/– ची महत्तम दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात जे.व्ही. पार्टनर यांनी दोन वेगवेगळे पत्र दिले आहे. दोन्ही पत्रामुळे संभ्रम निर्माण झाला आहे. असे स्थायी समितीस वाटते. तेव्हा प्रशासनाने या पत्राचा नियमाप्रमाणे खुलासा करुन कार्यालयीन अभिमतासह विषय परत स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी प्रस्तावित विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 20 :– नागपूर महानगरपालिकेतील कार्यरत वाहने/मशीनरी कारखाना विभागातर्फे देखभाल व दुरुस्ती केल्या जात असुन वाहनांचे/मशीन्स सुटे भाग विकणारे आटो मोबाईल क्षेत्रातील अधिकृत विक्रेते ज्यांचा एखादा चांगल्या वाहन देखभाल/दूरुस्ती केंद्रासोबत वाहन दुरुस्तीचा पंजीकृत करारनामा आहे किंवा ऑटोमोबाईल्स क्षेत्रातील वाहन देखभाल/दुरुस्ती केंद्र ज्याच्या वाहन/मशिनचे सुटेभाग विकणारे अधिकृत विक्रेता सोबत वाहनाचे मशिनचे सुटे भाग खरेदीचे/पुरविण्याचा पंजीकृत करारनामा आहे. अश्या निवेदेतील सहभागी विक्रेता/गॅरेजकडून वाहनाची दूरुस्ती आणि वाहनांना लागणारे सुटे भाग, टायर टयुब फ्लॅप खरेदी दूरुस्ती, बॅटरी खरेदी, हार्डवेअर मटेरियल्स खरेदी, सिव्हरलाईन मशीन, स्पेअर पार्ट खरेदी/दूरुस्ती, बॅटरी खरेदी, हार्डवेअर मटेरियल्स खरेदी, सिव्हरलाईन मशीन, स्पेअर पार्ट खरेदी /दूरुस्ती, बॉडी बिल्डींग/व्हिल बॅरोज/निटर बिन ईत्यादी खरेदी/दूरुस्तीचे द्विवार्षीक दरकरार करण्यास्तव ई–निविदा मागविण्यात आल्या व उघडण्यांत येवून निविदाकारांच्या प्राप्त दरांच्या वर्गीकरणासह तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत येवून निम्नतम दराची आयटमनुसार दरसूची तयार केली आहे.

निविदेच्या अंतर्गत वेगवेगळया ऑयटमकरीता वेगवेगळया संबंधीत निविदाधारकाचे वेगवेगळे दर असल्यामुळे प्रत्येक ऑयटमकरीता विभागाला प्राप्त निम्नतम दर हे सिलींग दर म्हणून त्या–त्या स्पेअर्स वा दूरुस्ती ऑयटमकरीता निश्चित धरण्यांत येवून ज्या निविदाधारकाने संबंधीत ऑयटमचे स्पेअर्स वा दूरुस्ती करण्यांस अथवा साहित्याचे निम्मतम दर सादर केलेत त्यांच्याकडून निम्नतम दरावर स्पेअर्स खरेदी व दूरुस्ती करण्यांस प्रथम प्राधान्य देण्याची विभागाची शिफारस आहे. तसेच निम्नतम दर असलेले निविदाधारक यांना सदर दरात साहित्य देण्यांस व दूरुस्तीस काही तांत्रीक अडचण उद्‌भवल्यास त्याच निम्नतम दरावर इतर संबंधीत निविदा धााराकाकडून स्पेअर्स पूरवठा अथवा दूरुस्ती काम करुन घेण्यांची तसेच आरोग्य विभागाला लागणारे काही साहित्याचे दर अंतर्भूत असुन सदर निम्नतम दरावर साहित्य संबंधीत पदातुन खरेदी करण्यांची विभागाची शिफारस आहे.

उपरोक्त निम्नतम दर हे प्रस्तावाच्या मंजूरीनंतर दरकरार म्हणून दोन वर्षाचे कालावधीकरीता ग्राहय धरण्यांत येवून विभागाने दर्शविलेल्या ज्या स्पेअर व दूरुस्ती आयटमचे दर निविदाधारकांना भरलेले नाही असे ऑयटम किंवा सूची अंतर्गत समाविष्ट नसलेले ऑयटम हे प्रोफोरमा इन्व्हाईस/आवेदनाद्वारे खरेदी अथवा दूरुस्ती करण्यांची शिफारस असुन विभागाला प्राप्त निम्नतमदरास द्विवार्षीकदरकरार म्हणून स्विकृती करण्यांचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात कीती खर्चास मान्यता द्यावयाची आहे याचा खुलासा होत नाही. तसेच कार्यालयाने नस्ती मध्ये Soft Copy जोडली आहे. त्यांतुन कोणत्या दरांची स्पष्ट कल्पना होत नाही व या बाबत कार्यालयाची भुमिका पण स्पष्ट होत नाही. या सर्व बाबींची माहिती स्थायी समितीस व्हावी या दृष्टीने निम्नतम दरांच्या आयटम सह संपूर्ण यादी सादर करण्यास्तव प्रस्तावित विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 21 :— वाहतुक विभागाचे आस्थापनेवर असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन e-payment मार्फत करण्या करीता नागपूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात वाहतुक विभागाचे आस्थापना खर्च करीता रुपये 25.0 लक्षचे वेगळे पद निर्माण करणे किंवा महसूली व्यय पद क्रमांक 356 चे व्यय शिर्ष "वर्कचार्ज आस्थापना खर्च" ऐवजी "वाहतुक विभाग आस्थापना खर्च" असे दर्शविण्यास विनंती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाचे निवेदना प्रमाणे विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 22 :— नागपूर शहरात मासोळी बाजारपेठ उभारण्याच्या अनुषंगाने म.न.पा. मंगळवारी बाजार, सदर सर्वे क्र. २५८१, मौजा जरिपटका येथे ठोक व घाऊक मासोळी विपणन केंद्र, स्थापत्य स्वरुपाचे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. जे.बी. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा वाटाघाटीनंतर ४.९३ टक्के अधिक दर असलेली रु. २,१३,२८,५२१/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा तसेच या कामास्तव आर्किटेक्ट श्री. निशीकांत एन. भिवगडे, यांची प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील L1, यांनी स्थायी समिती समोर पत्र दिले आहे. या L1, च्या पत्राचा नियमाप्रमाणे योग्य खुलासा करुन कार्यालयीन अभिमतासह हा विषय परत स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 23 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| हस्ता /— हरीष दुबे | हस्ता /— दयाशंकर तिवारी |
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | अध्यक्ष<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |